# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.05.2025** **वार:बुधवार**

1. पंजाबमधल्या आदमपूर वायू दल तळाला भेट देत पंतप्रधानांनी साधला जवानांशी संवाद
2. राज्यात कृत्रिम वाळूबाबतच्या धोरणाला मंत्रिमंडळाची मंजुरी
3. राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत 94 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण; केंद्रीय शिक्षण मंडळाच्या दहावी-बारावीच्या परीक्षांचे निकालही जाहीर आणि
4. खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचं पदकांचं शतक

**पंतप्रधान**

दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानी सैन्यालाच, भारतीय लष्कर, वायुदल आणि नौदलाने धूळ चारली; त्यामुळे दहशतवाद्यांना लपून बसता येईल अशी जागाच आता पाकिस्तानमध्ये उरलेली नाही, असं ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंजाबमध्ये आदमपूर इथल्या वायू दलाच्या तळाला त्यांनी काल भेट दिली आणि जवानांशी संवाद साधला. ऑपरेशन सिंदूरमध्ये सेनादलांनी बजावलेल्या कामगिरीचा, सैनिकांच्या शौर्याचा त्यांनी गौरव केला. ऑपरेशन सिंदूरमुळे देशभरात अभिमान आणि एकीची भावना अधिक बळकट झाली असल्याचं ते म्हणाले.....

**आप सभी ने कोटी कोटी भारतीयोंका का सीना चोड़ा कर दिया है | हर भारतीयोंका माथा गर्वसे उंचा कर दिया है | आपने इतिहास रच दिया है | आज से अनेक दशक बाद भी जब भारत के इस पराक्रम की चर्चा होगी, तो उसके सबसे प्रमूख अध्याय आप और आप के साथ ही है | आप सभी वर्तमान के साथ भी, देश की आने वाली पीडियों की और उनके लिए भी, नई प्रेरणा बन गए, मैं वीरों की इस धर्ती से आज एरफोर्स, नेवी और आर्मी के सभी जाबाजों BSF के अपने शूर वीरों को सॅलूट करता हूँ।**

**सरन्यायाधीश**

भारताचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांचा आज शपथविधी होणार आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. न्यायमूर्ती गवई भारताचे 52वे सरन्यायाधीश असतील.

**मंत्रिमंडळ निर्णय**

नैसर्गिक वाळूच्या अती उत्खननामुळ निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय संकटांना आळा बसावा, तसंच बांधकाम क्षेत्राला पर्यायी आणि टिकाऊ साधन उपलब्ध व्हावं, यासाठी राज्यात कृत्रिम वाळूचं उत्पादन आणि वापर करण्याच्या धोरणाला काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यात 50 व्यक्ती किंवा संस्थांना कृत्रिम वाळू निर्मिती केंद्र स्थापन करण्यासाठी उद्योग विभाग सवलती देणार आहे.

या निर्णयाबरोबरच कालच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. रस्त्यावर राहणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक ही सर्वंकष योजना राज्यात नियमित स्वरूपात राबविण्यालाही बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळ रस्त्यावर राहणाऱ्या हजारो बालकांना शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि नवजीवनाची संधी मिळणार असून ही योजना बालहक्कांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचं म्हणजेच आयटीआयचं सार्वजनिक खासगी भागीदारीद्वारे अद्ययावतीकरण करण्यालाही मंजुरी देण्यात आली. तसंच राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विदयापीठाच्या नागपूर इथल्या उपकेंद्राला मौजे चिंचोली इथली सुमारे 20 हेक्टर जमीन देण्याचा निर्णय काल मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

**मनोहरलाल खट्टर**

राज्यात मेट्रोचं जाळ अधिक विस्तारीत करण्यासाठी तसंच नागरी क्षेत्रातील विविध प्रकल्पांच्या व्यापक अंमलबजावणीसाठी आवश्यक सर्व सहाकार्य केंद्रीय नगरविकास मंत्रालयाकडून करण्यात येईल, अशी ग्वाही केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी काल मुंबईत दिली. राज्यातील नागरी क्षेत्रातील विकासकामांच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**दहावी निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं यावर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यंदा सुमारे 94 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ऐकुयात याविषयी आधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...

**दहावीच्या नियमित परीक्षेसाठी यंदा राज्यातील नऊ विभागीय मंडळातून 15 लाख 46 हजार 579 नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी 14 लाख 55 हजार 433 जण उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी पेक्षा यंदा 1 पूर्णांक 71 टक्क्यांनी निकाल घटला आहे. यावर्षीही मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी 96 पूर्णांक 14 टक्के इतकी आहे. तर 92 पूर्णांक 31 टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. यंदाही कोकण विभागाची उत्तीर्णतेची टक्केवारी सर्वाधिक असून यात 98 पूर्णांक 82 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर सर्वात कमी निकाल हा नागपूर विभागाचा असून त्याची टक्केवारी 90 पूर्णांक 78 टक्के इतकी आहे. एकूण 62 विषयांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती त्यातील 24 विषयांचा निकाल हा शंभर टक्के इतका आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले पुणे.**

**निकाल**

केंद्रीय शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकालही काल जाहीर करण्यात आला. देशभरातून दहावीच्या परीक्षेत सुमारे 94 तर बारावीच्या परीक्षेत सुमारे 88 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेतही उत्तीर्णांमध्ये मुलींचं प्रमाण अधिक आहे.

**छ.संभाजी महाराज जयंती**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची आज जयंती आहे. लेखणी आणि समशेर यांचा अनोखा संगम असणारे छत्रपती संभाजी महाराज हे सर्वांसाठी ऊर्जा आणि प्रेरणेचा स्त्रोत आहेत. त्यानिमित्तानं त्यांचं जन्मठिकाण असलेल्या पुरंदर किल्ल्याच्या तालुक्याच्या ठिकाणी सासवडमध्ये आज प्रथमच राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'जयतु शंभू' या सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात ढोल पथक, मर्दानी खेळ, वासुदेव, गोंधळी असे शंभरहून अधिक लोक कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत कालचा दिवस महाराष्ट्रासाठी वैशिष्ट्यपूर्ण ठरला. राज्याच्या पदकांनी गाठलेला शतकाचा टप्पा, जिम्नॅस्टिकमध्ये डझनभर पदकं, विविध विक्रमांचं केलेलं सप्तक, आणि कुस्तीत पदकांचा ठोकलेला षटकार यामुळे स्पर्धेत कालही महाराष्ट्राचाच दबदबा होता. या स्पर्धेत आतापर्यंत 44 सुवर्ण, 33 रौप्य आणि 30 कास्य पदकाची कमाई करत महाराष्ट्राला एकंदर 107 पदकं मिळाली आहेत. वेगवान धावपटूचा मान महाराष्ट्राच्या आदित्य

पिसाळने पटकविला. शौर्या अंबुरेने पदकाची हॅटट्रिक पूर्ण केली. जिम्नॅस्टिक क्रीडा प्रकारात परिना मदनपोत्रा हिनं सुवर्णपदकांची हॅट्रिक केली. शुभश्री मोरेलाही सुवर्ण पदक मिळालं आणि रिदमिक जिम्नॅस्टिक या सांघिक प्रकारातही महाराष्ट्रानं सुवर्ण पदक जिंकलं. कुस्तीमध्ये सांगलीच्या परमान परम माळी यानेही सुवर्ण कामगिरी केली. याशिवाय जुई नारकर, ग्रीष्मा थोरात, आनंदी सांगळे यांनी भारोत्तोलनात आणि सायकलिंग क्रीडा प्रकारात रुपेरी कामगिरी केली.

**पाऊस**

राज्यात काल विविध भागात पावसानं जोरदार हजेरी लावली. या पावसामुळ हवेत गारवा निर्माण झाला असला तरी शेतकऱ्यांची चिंता मात्र काही प्रमाणात वाढली आहे. पुणे शहर आणि परिसरात काल दुपारी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या.

सांगली जिल्ह्याच्या काही भागात काल मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडला. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून होत असलेल्या पावसानं तापमानात कमालीची घट झाली आहे. त्यामुळे फळबागायतदार शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. नाशिक शहर आणि परिसरात काल सलग तिसऱ्या दिवशी पावसानं हजेरी लावली. त्यामुळं मोठी झाडं उन्मळून पडल्यानं अनेक रस्ते बंद झाले.

**हवामान**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस बंगालच्या उपसागरातल्या दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटं आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागात पोहोचला आहे. येत्या 3-4 दिवसात मान्सून आणखी पुढं सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. राज्यात आज तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.